ड

FORM-I A

N.C.R.B.
I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य महाराष्ट्र, जिल्हा मुंबई, पोलीस ठाणे लाप्रवि, मुंबई, पहिली खबर क्र. ३३ वर्ष २०१९, दिनांक १८/१०/१९
State District Police Station FIR No. Year Date

2. (i) अधिनियम Act भ्र.प्र.कायदा १९८८ (सुधारणा २०१८) कलमे Sections कलम ७
(ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार गुरुवार, तारीख पासून १०/१०/१९ वेळ ..........., तारीख पर्यंत १८/१०/१९ वेळ ...........
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा तारीख १०/१०/१९, वेळ ...........
Information received at P.S. Date Time
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. २/१९, तारीख १८/१०/१९, वेळ ००:४५ वा.
General Diary Reference : Entry No. Date Time

4. माहितीचा प्रकार Type of Information : ..........., लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा १३ किमी ईशान्य चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. चेंबुर
Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव साईकिरण अपार्टमेंट, ठिकाणाचे नंबर प्लॉट क्र. २१८ गल्ली चे समोर, रस्त्याचे नाव ...........
Address of Occurrence Name ११ नंबर रोडवर No. if any चेंबुर (पुर्व) Ward मुंबई Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण फेडरल बँक, गाव चेंबुर (पु) पोस्ट मुंबई, तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
Nearest identifiable Place Village Post Taluka Distt. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव ..........., तालुका ..........., जिल्हा ..........., राज्य ...........
In case, outside the limit of this Police Station Taluka Distt. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नांव Name नितिनकुमार शिंदे (b) वडीलाचे / पतीचे नाव भिकाजी शिंदे
Father's /Husband's Name
(c) जन्म तारीख व वय ५२ वर्षे (d) राष्टीयत्व भारतीय फोन नं. 9322270777 9869970777
Date of Birth & Age Nationality Phone No.
(e) पारपत्र क्रमांक ........... दिल्याचा दिनांक ........... दिल्याचे ठिकाण ........... (f) व्यवसाय ...........
Passport No. Date of Issue Place of Issue Occupation
(g) धर्म Religion हिंदु, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
(h) पत्ता : ५/८९ गल्ली / सर्वे नं. जय शास्त्री नगर, घर / नाव नंबर गुरु गोविंद सिंह मार्ग फोन / मो. नंबर ........... पॅन नं. ........... व्होटर्स नं. ...........
Address : मुलुंड Ward कॉलनी, मुलुंड (प) House/Name No. मुंबई Phone/M. No. ४०००८२ Pan No. Card No.
रस्त्याचे नाव ........... जवळचे प्रसिद्ध ठिकाण ........... गाव ........... पोस्ट ........... पो. स्टे. ...........
Road Nearest identifiable place Village Post P. Stn.
तालुका ........... जिल्हा ........... राज्य ........... सध्याचा पत्ता ...........
Taluka Distt. State Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
आनंद दशरथ वावरूकर, वय ४४ वर्षे, पद - मुकादम, घनकचरा व्यवस्थापन कक्ष / पश्चिम विभाग, चेंबुर, बृहन्मुंबई महानगरपालिका
रा.ठि. - भिमसेवक संघ, टाटानगर नं. २, गोवंडी, मुंबई ४०००४३

Scanned by CamScanner

फिर्यादी नामे नितिनकुमार भिकाजी शिंदे वय ५२ व
यांचा दिनांक १८/१०/२०१९ रोजीचा स्वतंत्र कागदाव
नोंद केलेला जबाब हीच या गुन्ह्यातील प्रथम
खबर संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(उमेश कोंडे)
ला.प्र.वि., मुंबई

17/10/19

जबाब दिनांक :– १७/१०/२०१९

नितीनकुमार भिकाजी शिंदे, वय ५२ वर्षे, धंदा – कॉन्ट्रक्टर, (महानगर पालिका), राठि – ५/८९, जय शास्त्री र, गुरु गोविंद सिंघ मार्ग, मुलुंड कॉलनी, मुलुंड (पश्चिम), मुंबई ८२ मो.क्र. ९३२२२७०७७७ व ८६९९७०७७७७

................

मी वरीलप्रमाणे असून नमुद पत्त्यावर माझे कुंटुबियांसह रहावयास आहे. मी बृहन्मुंबई महानगर पालिकेत मे. सेटी ट्रेंडीग कॉर्पोरेशन या नावाने ठेकेदारीचा व्यवसाय करत आहे. सदर व्यवसायातून मिळणाऱ्या उत्पन्नावर मी माझ्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करीत आहे.

मला बृहन्मुंबई महानगर पालिकेकडुन गोंवडी ते कुर्ला या दरम्यान असलेल्या संपूर्ण परिसरातील दगड, माती, गाळ इ. जेसीबी व डपरच्या सहाय्याने उचलुन नेण्याचे काम दोन वर्षाच्या कालावधी करीता टेंडरने मिळालेले आहे. सदर विभागात मी मागील १२ ते १५ महिन्या पासुन माझे कंत्राटाचे काम करीत आहे. सदर कामासाठी मी श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु वय ३५ वर्षे, राठि– बि–९४, रुम नं. ५१५, न्यु म्हाडा कॉलनी, मानखुर्द, (पश्चिम), मुंबई ४३ याची सुपरवायझर म्हणुन नेमणुक केलेली आहे. तो कामावर देखरेख करुन माझे जेसीबी, डपर व त्यांचे चालक तसेच कामगार इत्यादीवर देखरेख करुन सदर विभागातील कामे करुन घेत असतो.

सदर कामकाजाचे देखरेखीसाठी बृहन्मुंबई महानगर पालिकेकडुन दोन कर्मचारी नियुक्ती करण्यात आले असुन. त्यापैकी एक महानगर पालिकेचे कर्मचारी(लोकसेवक) हा गेल्या सहा महिन्या पासुन माझे सुपरवायझर कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु यांचेकडे प्रति महिना रु. ६०००/– एवढी लाच स्वरुपात रक्कम देण्याचा तगादा लावत होता. याबाबत सुपरवायझर यांनी मला वारंवार कल्पना दिलेली असुन, मी आजवर एकही रुपयांची रक्कमेची लाच त्या लोकसेवकाला दिलेली नसल्याने, त्याचा राग मनात धरुन जाणीव पूर्वक वेगवेगळया कारणास्तव तो माझे वाहनावर खोटी दंडात्मक कारवाई करुन, सुपरवायझर व माझे कर्मचाऱ्याना त्रास देत आहे. दि. १०/१०/२०१९ रोजी दुपारी ०१.०० वा.चे सुमारास मी एम/पूर्व विभाग कार्यालया जवळ उभे असताना, माझे सुपरवायझर तेथे आले व वर नमुद लोकसेवक वारवार पैशांची मागणी करीत असल्याचे त्याने मला सांगितले. त्यावेळी मी सुपरवायझर शेरु यांस सांगुन, आमचे जेसीबी ऑपरेटरला फोन करुन, त्या लोकसेवकाशी बोलणी केली. त्यानुसार नमुद लोकसेवक याने दि. ११/१०/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास पैशाची मागणी संबंधाने बोलणी करण्यास बोलाविले. मला लोकसेवकास लाच देण्याची ईच्छा नसल्याने, मी दिनांक १०/१०/२०१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे येवुन पो.नि. उमेश गौंड यांचेकडे लोकसेवक विरुध्द स्वःहस्ताक्षरात तक्रार केली. पो.नि. उमेश गौंड यांनी माझी लेखी तक्रार घेवुन माझे तक्रार अर्जाची दोन शासकीय पंचा समक्ष दि. ११/१०/२०१९ रोजी पडताळणी करण्यात येईल असे सांगुन, मला दिनांक ११/१०/२०१९ रोजी ला.प्र.वि. कार्यालयात बोलाविले, त्याप्रमाणे मि त्यांचे ला.प्र.वि. कार्यालयात गेलो असता, त्यांनी दोन शासकीय पंचाना पाचारण केले.

त्यानंतर मी, पंच व पोलीस पथकासह साईकिरण अपार्टमेंन्ट, प्लॉट क्र. २१७, रस्ता क्र. ११, चेंबुर, पूर्व, मुंबई येथील चहाचे स्टॉल जवळ पडताळणी कामी गेलो असता, सदर ठिकाणी माझे सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु हा त्यांचे सोबत एका इसमास घेऊन आला व त्याने त्यांची ओळख महानगर पालिके कर्मचारी/मुकादम असल्याचे सांगुन ते त्यांच्या कामाकरीता निघुन गेला. सदर वेळी मि त्याची ओळख करून घेवुन, त्यांचेशी बोलणी केली असता, नमुद आनंद नावाचे लोकसेवकाने या आधी माझे सुपरवायझर कडे सांगीतलेल्या, दर महिना रु. ६,०००/– मध्ये एक ते दिड हजार रुपये कमी जास्त करुन, ११ महिन्याचे पैसे सुपरवायझर शेरु यांचेकडे पाठवून देण्यास सांगितले.

मी दिनांक १०/१०/२०१९ रोजी लोकसेवक यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी संदर्भात दि. ११/१०/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई दरम्यान लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने, परंतु लोकसेवक दोन ते तिन दिवस त्यांचे वैयक्तिक कामानिमित्त बाहेर असल्याचे मला माहिती मिळाल्याने, यापूढील करावयाची सापळा कारवाई पुढे ठेवणेबाबत मी सांगितल्यावरुन, आज दिनांक १७/१०/२०१९ रोजी सापळापुर्व/सापळा कारवाई आयोजित करणार असल्याने, माझे वैयक्तिक बचतीमधुन लाचेची रक्कम रु. २५,०००/– व माझे सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु यास सोबत घेवून, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात हजर झालो. पो.नि उमेश गौंड हे आम्हाला पहिल्या मजल्यावरील गोपनिय कक्षामध्ये घेवून गेले. तेथे हजर पोलीस कर्मचारी याचे मदतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये पो.नि. उमेश गौंड, यांनी माझे, सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु व पंचांचे वक्तव्य रेकॉर्ड केले.

Scanned by CamScanner

सदर सापळा कारवाईत सहभागी होणारे अधिकारी व अंमलदार यांची आम्हा सोबत ओळख करून देवुन, स. पो.आ. आबासाहेब पाटील व पो.नि. उमेश गौंड यांनी सापळापुर्व कारवाई बाबतच्या योग्यत्या सुचना आम्हा सर्वांना दिल्या. सदर वेळी मी माझेकडील रक्कम रु. २५,०००/— (भारतीय चलनातील रु. २०००/— च्या १२ व रु. ५००/— च्या २ नोटा) पो.नि. उमेश गौंड यांचेकडे दिले. तद्नंतर पो.नि. उमेश गौंड यांनी मी दिलेल्या सर्व नोटांचे पोलीस अंमलदारांमार्फत झेरॉक्स काढल्या. नमुद नोटांच्या दोन्ही बाजूस ॲन्थ्रेसिन पावडर लावून, सदर रक्कम माझे सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु याचें शर्टाचे खिशात ठेवली. त्यानंतर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु याला सुचना दिल्या की, लोकसेवकाने लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर सापळा पथकास इशारा म्हणून त्याने डावा हात डोक्यावर फिरवावा. त्यांनतर पो.नि. उमेश गौंड यांनी ब्युरो कार्यालयातच सापळापुर्व कारवाई पुर्ण करून पुढे सापळा कारवाईचे आयोजन केले.

तद्नंतर मी, सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु, पो.नि. उमेश गौंड, सपोआ आबासाहेब पाटील, पोलीस पथक, पंच असे दोन पोलीस वाहनांमधून चेंबुर, पश्चिम, मुंबई येथे रवाना होण्यापुर्वी सापळा पथकात काम करणाऱ्या इतर अंमलदारांशी आमची ओळख करुन दिली. त्यांनतर आम्ही साईकिरण अपार्टमेंन्ट, प्लॉट क. २१७, रस्ता क. ११, चेंबुर, पूर्व, मुंबई येथे जवळपास पोहचलो असता काही अंतरावर सरकारी वाहने उभी केली. त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांचे सुचने प्रमाणे सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु यास लोकसेवक आनंद यांस त्याचे मोबाईलवर संपर्क करुन, साईकिरण अपार्टमेंन्ट, प्लॉट क. २१७, रस्ता क. ११, चेंबुर, पूर्व, मुंबई चे समोरील चहाचे स्टॉलजवळ तो आला असल्याबाबत कळविण्यास सांगितले. त्यावेळी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु यांचे शर्टाचे आतिल बनियानला लावला. सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु यांने लोकसेवक यांस मोबाईलवर संपर्क करुन, सदर ठिकाणी आल्याबाबत कळविले. त्यावेळी लोकसेवक यांने १० मिनिटात चहाचे स्टॉल जवळ येतो असे सांगितले.

त्यानंतर पो.नि. उमेश गौंड यांचे सुचनेप्रमाणे सुपरवायझर श्री. कबिर बद्रुद्दीन शेख उर्फ शेरु यांचे सोबत पंच श्री. उदय कदम हे दोघेही वर नमुद चहाचे स्टॉलजवळ पोहचले. त्यापाठोपाठ इतर पथक ही त्याचें मागुन गेले. सदर वेळी मी पोलीस वाहनात थांबुन राहिलो. काही वेळाने सदर सुपरवायझर शेरु यांने माझे मोबाईलवर टेक्स मेसेज पाठवून लाचेची रक्कम लोकसेवक आनंद याने आमचे डपंरचा चालक नागराज यांचेकडे देण्यास सांगितले असल्याचे कळविले, व सदरचे पैसे नागराज याचेकडे दयावे किंवा कसे? याबाबत विचारणा केली. त्याप्रमाणे मी पो.नि. उमेश गौंड याचे मार्गदर्शनान्वये सदर लाचेची रक्कम नागराज यांचेकडे देण्याबाबत शेरु यास कळविले. त्यानंतर थोडयावेळाने वर नमुद पथक त्याचें सोबत लोकसेवक आनंद व नागराज या दोघाना घेवुन मी बसलेल्या पोलीस वाहना जवळ आले. सदर वेळी पो.नि. उमेश गौंड यांनी सापळा कारवाई यशस्वी झाल्याची माहिती दिली.

तरी लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर, मुकादम, घनकचरा व्यवस्थापन, एम—प विभाग, बृन्मुबंईमहानगर पालिका, सांण्डु गार्डन जवळ, चेंबुर पश्चिम, मुंबई यांने माझे गोंवडी ते कुर्ला या दरम्यान चालत असलेल्या दगड, माती, गाळ इ. जेसीबी व डपंरच्या सहाय्याने उचलुन नेण्याचे कत्रांट कामाकरीता वापरत असलेल्या डंपर व जेसीबी या वाहनावर कारवाई करु नये याकरीता मागील ११ महिन्यापासुनचे प्रति महिना रु. ६०००/— असे लाच म्हणुन मागणी करुन, तंडजोडीअंती प्रति महिना रु. ४०००/— असे ११ महिन्याचे एकूण रु. ४४,०००/— ची मागणी केली व त्यापैकी रूपये २५,०००/— रक्कम त्याचे वतीने माझा डंपरचा चालक नागराज रामण्णा बजरोल्लु याने लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर यांचे सागण्यावरुन स्विकारली म्हणून माझी नमुद लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर, मुकादम, घनकचरा व्यवस्थापन, एम—प विभाग, महानगर पालिका, सांण्डु गार्डन जवळ, चेंबुर पश्चिम, मुंबई यांचेशी माझे पुर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी आर्थिक देण्या—घेण्याचे व्यवहार नाहीत.

माझा जबाव संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मला हिंदीतून समजावून सांगितला तो माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

(उमेश गौंड) 31/10/2019

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

31/10/2019

Scanned by CamScanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ....................

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

....................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य ....................

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) रु. २५,०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ....................

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोन्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील फिर्यादी यांना बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून गोवंडी ते कुर्ला दरम्यानच्या परिसरातील दगड, माती, गाळ इ. जेसीबी व डंपरच्या सहाय्याने उचलुन नेण्याचे कंत्राट मिळाले आहे. सदर कामकाजाच्या देखरेखीसाठी यातील लोकसेवक बावस्कर यांची नियुक्ती करण्यात आली होती. फिर्यादी यांच्या जेसीबी व डंपरवर कारवाई न करण्याकरीता लोकसेवक यांनी मागील ११ महिन्यापासुनचे प्रति महिना रु. ६०००/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती प्रति महिना रु. ४०००/- प्रमाणे एकुण रु. ४४०००/- लाचेची मागणी केली त्यापैकी रु. २५०००/- लाचेची रक्कम लोकसेवक यांचे सांगण्यावरुन त्यांचेसोबत असलेले नामे नागराज वझरेकर यांनी स्विकारले म्हणून लोकसेवक नामे आनंद दशरथ बावस्कर यांचे विरुद्ध भ्र.प्र.अधि १९८८ (सुधारणा २०१८) कलम ७ अन्वये गुन्हा नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कालम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

....................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

....................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...................., जिल्हा ...................., राज्य ....................,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ................ Rank................ No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .................... (3) Transferred to P.S ...................., District .................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही/अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी

Signature of Officer In-charge of Police Station

संपूर्ण नाव Name उमेश रमेश गोंड

पदनाम Rank पोलीस निरीक्षक

तपासिक अं. चा कोड. क्र.

Posting

Code No. of I.O. ....................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ....................

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned by CamScanner